# कर्जत नगरपरिषद, कर्जत, जि.रायगड

( उपविधी क्र.13.1 )

## भागश: भोगवटा प्रमाणपत्र ( Part O.C. )

कर्जत नगरपरिषद हद्दीतील मौजे दहिवली तर्फे निड व आकुर्ले येथिल स.नं. 41/0 व 97/0 एकूण क्षेत्र. 11000.00 चौ.मी. जागेवरील इमारतीचे बांधकाम/पुनर् उभारणी/ फेरबद्दल करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्र.इमारत/ कात-1/एस आर. 30/15-16 दिनांक 11/08/2015 अन्वये मे. जीसी व्हेंचर्स लि. तर्फे डायरेक्टर यांना निवासी व वाणिज्य कारणासाठी स्टिल्ट मजला + तळमजला व त्यावर सात मजले बांधकामास परवानगी देण्यांत आलेली आहे.

वरील परवानगी प्रमाणे अर्जदार यांनी आता विंग B, C व D भागश: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सदर इमारतीचे बांधकाम/उभारणी/ पुनर् उभारणी/ फेरबद्दल सौ. देवयानी मुसळे वास्तुविशारद, लायसन्स क्र. LA/00053 यांचे देखरेखेखाली दिनांक 10/06/2019 रोजी भागश: पूर्ण केले असल्याने खाली नमुद केलेल्या इमारतीचा भोगवटा करणेंस महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 च्या कलम 193 अन्वये व खाली नमुद केलेल्या परिशिष्ट "अ" ला अधिन राहुन परवानगी देत आहे.

### परिशिष्ट "अ"

1) सदर इमारतीचे क्षेत्र जरी मंजूर नकाशा प्रमाणे असले तरी सदरहु भुखंडाच्या चतु:सिमा मंजूर नकाशाप्रमाणे असल्याची खात्री करुन देण्यांची जबाबदारी / विकासकांवर राहील. तसेच सुधारीत रेखांकन मंजूर करुन घ्यावे लागेल.

2) आपण केलेल्या सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प सोसायटीने / सदनिका धारकांना सुस्थीतीत व त्याचा योग्य वापर करणे बंधनकारक आहे. व तशी समज विकासकाने सदनिका धारक / सोसायटीला देणेस यावी. तसेच भविष्यात सांडपाणी प्रकल्प बंद पडल्यास व इमारतीचे सांडपाणी नगरपरिषदेच्या पावसाळी गटारात सोडण्यात आल्यास सदरचे येणारे पाणी बंद करणेत येईल व सोसायटीवर दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घेणेत यावी. तसेच भोगवटा प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

3) सदर इमारतीचे वर नमुद केलेल्या बांधकाम परवानगी मधील सर्व अटी / शर्ती अर्जदारांवर बंधन कारक राहतील.

4) सदर भुखंडाचे उत्तर दिशेकडे 18.00 मी. रुंदीचा विकास योजना रस्ता व पश्चिम दिशेकडे 18.00 मी. रुंदीचा कोंदिवडे रस्ता असून सदर रस्त्यावर आपण कोणत्याही प्रकारचे बांधकाम अगर अडथळा निर्माण करु नये.

5) नागरी घनकचरा नियम 2016 अन्वये सदरचे इमारती मधील सदनिकाधारकांनी घनकचरा वर्गीकरण करणे अनिवार्य असून त्याकरीता हिरवा, निळा व लाल डस्टबीन अनुक्रमे ओला, सुका व घरगुती घातक घनकचरा करिता वेगवेगळे डस्टबीन विकासक यांनी ठेवणे बंधनकारक आहे. कर्जत नगरपरिषदेने ठरविलेले वारानुसार वर्गीकरन करणे आपणावर बंधनकारक असेल.

| इमारतीचे वर्णन | | | |
|---|---|---|---|
| जागेचा तपशिल | रस्ता | मजला | खोल्यांचे वर्णन |
| मौजे दहिवली तर्फे निड व आकुर्ले येथिल स.नं. 41/0 व 97/0 एकूण क्षेत्र. 11000.00 चौ.मी. | उत्तर दिशेकडे 18.00 मी. . रुंदीचा विकास योजना रस्ता व पश्चिम दिशेकडे 18.00 मी. रुंदीचा कोंदिवडे रस्ता | | विंग "B" |
| | | स्टील्ट मजला | फक्त वाहनतळासाठी/सोसायटी ऑफीस |
| | | तळ मजला | दुकानगाळे 6 (सहा) ( क्र. 7 ते 12 )<br>एक मीटर रूम ( Free of FSI ) |
| | | पहिला मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | दुसरा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | तिसरा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | चौथा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | पाचवा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | सहावा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | सातवा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | | विंग "C" |
| | | स्टील्ट मजला | फक्त वाहनतळासाठी |
| | | तळ मजला | दुकानगाळे 9 (नऊ) (क्र. 13 ते 21 ) |
| | | पहिला मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक<br>3 रुम किचनचा 2(दोन) ब्लॉक |
| | | दुसरा मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |
| | | तिसरा मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक<br>3 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |
| | | चौथा मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक<br>3 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |
| | | पाचवा मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक<br>3 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |
| | | सहावा मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक<br>3 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |
| | | सातवा मजला | 2 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक<br>3 रुम किचनचा 2 (दोन) ब्लॉक |
| | | | विंग "D" |
| | | स्टील्ट मजला | फक्त वाहनतळासाठी |
| | | तळ मजला | दुकानगाळे 6 (सहा) (क्र. 22 ते 27 ) |
| | | पहिला मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | दुसरा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | तिसरा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | चौथा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | पाचवा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | सहावा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| | | सातवा मजला | 2 रुम किचनचा 4 (चार) ब्लॉक |
| एकूण अंदाजे बिल्टअप क्षेत्रफळ 3708.00 चौ.मी | | | |

हा दाखला आज दिनांक 24/10/2019 रोजी माझ्या सही व कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

जावक क्र. 2418 /19-20
कर्जत नगरपरिषद,कर्जत
ता. कर्जत,जि. रायगड
दिनांक:-24/10/2019

मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद,कर्जत

प्रत :

1) मे. जीसी व्हेंचर्स लि. तर्फे डायरेक्टर
   रा. 209-210, आर्केडीया 195, नरीमन पॉइंट, मुंबई – 400201.

2) कर निरिक्षक, कर्जत नगरपरिषद, कर्जत यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी
   (मंजूर बांधकाम नकाशा व कार्पेट एरिया व फ्लॅट धारक यांची यादी)